**ठळक बातम्या**

- व्हेनेझुएला मधल्या अमेरिकेच्या हवाई हल्ल्यांवर चर्चा करण्यासाठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची उद्या आपत्कालीन बैठक

- जीरामजी योजनेबद्दल काँग्रेसने संभ्रम पसरवू नये असं केंद्रीय कृषीमंत्र्यांचं आवाहन

- महाराष्ट्रात २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीत १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात

- राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धांचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते वाराणसीत उद्घाटन

**आणि**

- तायक्वांडो खेळाच्या क्रमवारीत भारताच्या रुपा बायोरला आशियातलं अव्वल स्थान

<><><><><>

व्हेनेझुएला मधल्या अमेरिकेच्या हवाई हल्ल्यांवर चर्चा करण्यासाठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदने उद्या, सोमवारी आपत्कालीन बैठक बोलावली आहे. सुरक्षा परिषदेचा अ-स्थायी सदस्य असलेल्या कोलंबियाच्या विनंतीवरून ही बैठक बोलावली असून, त्याला चीन आणि रशिया, या स्थायी सदस्य देशांनी पाठिंबा दर्शवला आहे.

व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नी सिलिया फ्लोरेस यांना काल अमेरिकेनं अटक केली असून, त्यानंतर व्हेनेझुएलामध्ये केलेल्या हवाई हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतल्याचं संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेनं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

अमेरिकेच्या या कारवाईबद्दल संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी चिंता व्यक्त केली असून, हे आंतरराष्ट्रीय कायद्याचं उल्लंघन असल्याचं म्हटलं आहे. व्हेनेझुएलामधल्या कायद्याच्या राज्याचं आणि मानवी हक्कांचा आदर राखून सर्वसमावेशक संवादाचं आवाहन त्यांनी केल्याचं संयुक्त राष्ट्रांचे प्रवक्ता स्टीफन दुजारिक यांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

दरम्यान, व्हेनेझुएलाचे अध्यक्ष आणि त्यांच्या पत्नी सिलिया फ्लोरेस यांच्यावर न्यू यॉर्क इथल्या न्यायालयात आरोप निश्चित करण्यात आल्याचं अमेरिकेचे ॲटर्नी जनरल

पाम बोंडी यांनी म्हटलं आहे. अमेरिकेविरोधात नार्को-दहशतवादाचा कट रचल्याचा, तसंच विध्वंसक उपकरणं बाळगण्याचा त्यांच्यावर आरोप असून, त्यांच्यावर उद्या खटला चालवला जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.

व्हेनेझुएला मधल्या सध्याच्या घडामोडींबद्दल भारतानं तीव्र चिंता व्यक्त केली आहे. या संपूर्ण परिस्थितीवर आपण लक्ष ठेवत असून, व्हेनेझुएलाच्या नागरिकांच्या सुरक्षेसाठी आपलं पूर्ण सहकार्य असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

रशिया, चीन, इराण, ब्राझील आणि क्युबासह अनेक देशांनी अमेरिकेच्या लष्करी कारवाईचा निषेध केला असून, हे व्हेनेझुएलाच्या सार्वभौमत्वाचं आणि प्रादेशिक अखंडतेचं उल्लंघन असल्याचं म्हटलं आहे.

युरोपियन युनियनचं परिस्थितीवर बारकाईने लक्ष असून, आंतरराष्ट्रीय कायदा आणि संयुक्त राष्ट्रांची सनद, याचा आदर करण्यावर युरोपियन युनियनचे परराष्ट्र धोरण प्रमुख काजा कल्लास यांनी भर दिला आहे.

<><><><><>

व्हेनेझुएलाच्या सर्वोच्च न्यायालयाने उपराष्ट्राध्यक्ष डेल्सी रॉड्रिग्ज यांना देशाच्या हंगामी अध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारण्याचे आदेश दिले आहेत. निकोलस मादुरो यांच्या अटकेनंतर हा निर्णय घेण्यात आला. प्रशासकीय सातत्य आणि देशाची व्यापक सुरक्षा लक्षात घेता हा निर्णय घेतल्याचं न्यायालयानं स्पष्ट केलं आहे.

दरम्यान, व्हेनेझुएलामधल्या सध्याच्या आपत्कालीन परिस्थितीत ‘स्पेसएक्सच्या मालकीची स्टारलिंक सेवा व्हेनेझुएलामध्ये येत्या ३ फेब्रुवारीपर्यंत मोफत ब्रॉडबँड इंटरनेट सेवा पुरवणार असल्याचं टेस्लाचे सीईओ एलोन मस्क यांनी जाहीर केलं आहे.

या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर भारतीय नागरिकांनी व्हेनेझुएलाचा अनावश्यक प्रवास टाळावा, सध्या व्हेनेझुएलामध्ये असलेल्या सर्व भारतीयांनी अत्यंत सावधगिरी बाळगावी, अशा सूचना परराष्ट्र मंत्रालयानं जारी केल्या आहेत.

<><><><><>

विकसित भारत जी रामजी योजना पूर्वीच्या मनरेगा योजनेच्या तुलनेत अधिक पारदर्शक आणि कल्याणकारी असल्याचं केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान आंनी आज सांगितलं. या योजनेबद्दल काँग्रेस जनतेची दिशाभूल करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

मनरेगा योजनेसाठी प्रचंड आर्थिक तरतूद करुनही त्यातून दीर्घकालीन विकासाचं काम होऊ शकलं नाही, कारण त्यात भ्रष्टाचार होता असं ते म्हणाले. पूर्वीच्या योजनेपेक्षा जास्त दिवस काम देण्याची तरतूद जीरामजीमधे आहे, तसंच काम देता आलं नाही तर बेरोजगारी भत्ता देण्याची किंवा कामाचे पैसे वेळेवर दिले नाहीत तर अधिकाऱ्यांना दंड करण्याची तरतूदही नव्या योजनेत आहे, अशी माहिती त्यांनी दिली. नव्या योजनेने ग्राम सभा आणि ग्रामपंचायतीला जास्त अधिकार दिले आहेत असं ते म्हणाले. काँग्रेसने हा फरक समजून घ्यावा आणि संभ्रम निर्माण करणं थांबवावं असं आवाहन त्यांनी केलं.

- **- - होल्ड- बाईट- शिवराज सिंग चौहान - - -**

जी रामजी योजनेबद्दल महाराष्ट्रातल्या धाराशिव जिल्ह्यातल्या गावचे सरपंच सुहास घोगरे यांनी आकाशवाणीला दिलेली ही प्रतिक्रीया….

- **- - होल्ड - बाईट- सुहास घोगरे- - -**

- **<><><><><>**

महाराष्ट्रात २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी, अंतिम उमेदवार यादी काल जाहीर झाली. त्यानुसार राज्यातल्या महानगरपालिकांच्या २ हजार ८६९ प्रभागांमधून १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात आहेत.

या निवडणुकीसाठी एकंदर ३३ हजार ४२७ अर्ज आले होते. त्यातले २४ हजार ७७१ अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी ८ हजार ८४० उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे.

राज्यात सर्वाधिक १ हजार ७०० उमेदवार मुंबई महापालिका निवडणुकीत, तर १ हजार १६६ उमेदवार पुणे महापालिका निवडणुकीत आपलं नशीब आजमावत आहेत. नागपूरमध्ये ९९३ उमेदवार आहेत. सर्वात कमी २३० उमेदवार इचलकरंजी महापालिकेची निवडणूक लढवत आहेत.

**<><><><><>**

सन २०३६ मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिकचं यजमानपद मिळवण्याकरता भारत जोरदार प्रयत्न करत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. उत्तर प्रदेशात वाराणसी इथं होत असलेल्या राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धांचं उद्घाटन त्यांनी आज दूरस्थ पद्धतीनं केलं, त्यावेळी ते बोलत होते. विविध खेळांमध्ये २०१४ सालापासून देशाची कामगिरी सातत्यानं

सुधारत असून 'जेन झी'ची तरुण पिढी हातात तिरंगा घेऊन भारताचं प्रतिनिधित्व करताना पाहून देशाचा उर अभिमानानं भरून येतो. प्रत्येकाला आपापल्या भूमिका निभावतानाच त्यांच्या जबाबदाऱ्याही पार पाडायच्या असतात. मात्र, जेव्हा प्रत्येकजण आपापल्या जबाबदाऱ्या गांभीर्यानं पार पाडजतो, तेव्हाच यशाचं शिखर गाठता येतं. देशाचा प्रवासही याच दिशेनं होत असल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

तायक्वांडो खेळाच्या क्रमवारीत भारताच्या रुपा बायोर हिनं आशियातलं अव्वल स्थान पटकावलं आहे. जागतिक क्रमवारीत ती सहाव्या स्थानावर पोहोचली असून ही कामगिरी करणारी ती पहिली भारतीय खेळाडू आहे.

अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री पेमा खांडू यांनी रुपा बायोरच्या या कामगिरीबद्दल अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

गेलं वर्ष हे विविध क्षेत्रांप्रमाणेच राजकीय क्षेत्रासाठीही असामान्य वर्षं ठरलं. जागतिक स्तरावर भारताच्या उदयाचा निर्णायक अध्याय म्हणून या वर्षाकडे पाहिलं जाईल. आर्थिक अनिश्चितता, भूराजकीय उलथापालथ आणि सत्तेच्या बदलत्या समीकरणांच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे आंतरराष्ट्रीय घडामोडींमध्ये स्थैर्य देणारं व्यक्तिमत्व म्हणून उदयाला आले. याविषयी आता सविस्तर ऐकुया…

**- - व्हीसी - - -**

*(जागतिक व्यापारातल्या अस्थिरतेसाठी ओळखलं जाणारं २०२५ हे वर्ष प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाची कसोटी पाहणारं होतं. आणि देशांतर्गत निर्णायक नेतृत्वापासून ते परदेशातल्या मुत्सद्देगिरीपर्यंत त्यांनी त्या कसोट्या पार केल्या आणि जागतिक पातळीवर आदर मिळवला. ट्रम्प यांनी अतिरिक्त शुल्क लादल्यानंतरही प्रधानमंत्री मोदी आपल्या राष्ट्रप्रथम या भूमिकेवर ठाम राहिले आणि व्यापार करारांसाठी आणलेला दबाव भारताने धुडकावून दिला. त्याखेरीज भारताने धोरणात्मक व्यापारी करार करून आपलं भविष्य सुरक्षित केलं. भारत-यूके आणि भारत ओमान या दरम्यान झालेल्या करारांमुळे भारतीय वस्तुंना पश्चिम आणि आखाती देशांमध्ये शुल्कमुक्त प्रवेश झाला. न्यूझीलंडबरोबर झालेल्या करारामुळे भारताची करमुक्त निर्यात सुनिश्चित झाली. जागतिक अंदाजांना खोटं ठरवत*

*भारतीय अर्थव्यवस्थेत सकल राष्ट्रीय उत्पादनाने यंदा ८ पूर्णांक २ दशांश टक्के इतकी वाढ नोंदवली.)*

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या परीक्षा पे चर्चा या राष्ट्रीय संवादाच्या नवव्या भागात सहभागी होण्यासाठी इयत्ता ६ वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थी, त्यांचे पालक आणि शिक्षक पात्र आहेत. संबंधितांनी यात सहभागी होण्यासाठी माय जी ओ व्ही संकेतस्थावर नोंदणी करण्याचं आवाहन केंद्र सरकारतर्फे  समाज माध्यमांवर करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा आज समारोप होत आहे. ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ गुजराती  साहित्यिक रघुवीर चौधरी, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांसह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत. आज दिवसभरात संमेलनात, पुस्तक चर्चा, मुलाखत, कविसंमेलन, परिसंवाद आणि रात्री सांस्कृतिक कार्यक्रमही होणार आहे.

**//<><><><><>//**